REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख २५ ऑगस्ट, १९४८ अंक ३४

श्री श्री श्री श्री श्री

श्री

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

### युद्धोत्तरकालांत सिंडिकेटच्या सर्वांगीण
वाढीच्या योजना आखल्या जात आहेत.

कंपनीनें ऑर्डिनरी शेअरवर १० टक्के
डिव्हिडंड दिलें आहे.

सी. जी. आगाशे आणि कं.,
मॅनेजिंग एजंट्स.

श्री श्री श्री श्री श्री

## आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठीं आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**पाकिस्तानसाठी सिक्युरिटी प्रेस**—पाकिस्तान सरकारसाठी आणि स्टेट बँकेसाठी चलनी नोटा, रोखे व इतर छपाईचें काम करण्यासाठी एक सिक्युरिटी प्रिंटिंग कॉर्पोरेशन काढण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. कॉर्पोरेशनचें एकूण भांडवल ७५ लाख रुपयांचें राहील. त्यापैकीं ४५ लाख रुपये ताबडतोब वसूल केले जातील. भांडवलापैकीं ६० टक्के भांडवल सरकार देणार असून बाकीचें थॉमस दि लारू आणि कंपनी रोख व यंत्रसामुग्रीच्या रूपानें घालणार आहे. कंपनीनें इंग्लंडमधील आपल्या कारखान्यांत पाकिस्तानांतील तरुणांना सिक्युरिटी प्रेसचें काम शिकविण्याची सोय केली आहे. त्याचप्रमाणें, नाशिकमधील सिक्युरिटी प्रेसमधून पाकिस्तानमध्यें गेलेल्यांनाहि कंपनी घेणार आहे. येत्या नोव्हेंबरपासून प्रेसच्या कामाला प्रारंभ होईल असा अंदाज आहे.

**मध्यप्रांतांतील पोलाद कारखाना**—मध्यप्रांतांत पोलादाचे कारखाने काढण्याची शक्यता अजमावण्यासाठीं हिंद सरकारनें एक अमेरिकन तज्ज्ञांचें मंडळ नेमलें होतें. ह्या धंद्यासंबंधीं मध्यप्रांत सरकार जवळ असलेली सर्व माहिती मध्यप्रांत सरकारचे फडणीस श्री. मेहता ह्यांनीं अमेरिकन मंडळाला सांगितली. द्रुगच्या दक्षिणेला असलेल्या दिंडी लोहारा ह्या गांवाजवळ कारखाना काढला जाण्याचा संभव आहे असें म्हणतात. कारण, हें गांव मुख्य रेल्वे रस्त्यावर असल्यानें तयार झालेला माल दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानला पाठविणें सुलभ जाणार आहे. अमेरिकन तज्ज्ञ मंडळ मध्यप्रांतांतील आणखी तीन गांवांची ह्या दृष्टीनें पहाणी करणार आहे, असें कळतें.

**गळिताच्या धान्यांची निपज**—गळिताचीं धान्यें लावलेलें क्षेत्र १ कोटी, ३१ लाख, ५० हजार एकरांवरून ३ कोटी, ६४ लाख, ५० हजार एकरांपर्यंत गेलें पाहिजे; ही वाढ झाली तरच २१ लाख, ९३ हजार टन तेलें आणि स्निग्ध पदार्थ व ३४ लाख, ५० हजार पेंड निर्माण होईल असा अभिप्राय ऑइल्स व सोप इंडस्ट्रीच्या पॅनलेनें प्रकट केला आहे. लागवडींत करावयाची ही वाढ ५ वर्षांत अंमलांत यावी अशी पॅनलेची सूचना आहे. हे आकडे फाळणीपूर्वीच्या हिंदुस्थानसंबंधींचे आहेत.

**गांधी स्मृतीचीं तिकिटें**—म. गांधींच्या स्मृतीसाठी काढण्यांत आलेल्या तिकिटांना परदेशांतून—विशेषत: इंग्लंड व अमेरिका ह्यांकडून—फार मागणी येत आहे. अमेरिकेकडून १० हजार फोल्डर्सची मागणी आली आहे. ह्या फोल्डर्सचा उपयोग तिकिटें जपून ठेवण्यासाठी करण्यांत येणार आहे. इंग्लंडलाही असेच २ हजार फोल्डर्स पाठविण्यांत आले आहेत. कमी किमतीच्या तीन गटांची प्रत्येकीं ४ लाख आणि १० रुपये किमतीचीं २५ हजार तिकिटें इंग्लंडला व अमेरिकेला पाठविण्यांत आलीं आहेत.

**मुंबई प्रांतांतील बटाट्याचें पीक**—मुंबई प्रांतांतील बटाट्यांची लागवड बाहेरून येणाऱ्या बियाण्यावर अवलंबून असे; कारण प्रांतांतील बटाट्यांच्या पिकावर कीड पडल्यानें त्यांचा बियाणासाठी उपयोग होत नसे. युद्धापूर्वी बटाट्याचें बीं इटलींतून आयात केलें जात असे. दक्षिण हिंदुस्थानांत ज्या ठिकाणीं बटाटा लावला जातो, तेथें सिमल्याच्या डोंगरांतील 'नंबरी' जातीचा बटाटा चांगला येतो असें सिद्ध झालें आहे. मुंबई प्रांताची बटाट्याच्या बियाणाची गरज साधारणपणें ३ लाख बंगाली मण आहे. सरकार बियाणें मिळविण्याची व त्याच्या वहातुकीची व्यवस्था करीत आहे. पुढच्या रब्बीच्या हंगामांत २८ लाख बंगाली मण बटाटा उत्पन्न व्हावा असा अंदाज आहे.

**पोस्ट ऑफिसांतून आगपेट्या मिळणार ?**—दिल्ली येथें हिंदमधील पोस्ट-मास्टर जनरल्सची एक परिषद् नुकतीच भरली होती. परिषदेच्या शेवटच्या बैठकींत, नियंत्रित किंमतीनें पोस्ट ऑफिसांतून लोकांना आगपेट्या विकत देण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यांत आला.

**रिझर्व्ह बँकेच्या नफ्यांत पाकिस्तानचा हिस्सा**—रिझर्व्ह बँकेस गेल्या वर्षी १०,३८,२८,४२९ रु. नफा झाला. त्यापैकी २०,००,००० रु. ४% डिव्हिडंडसाठी लागले. उरलेल्या १०,१८,२८,४२९ रुपयांपैकी सुमारें १३ कोटि रु. पाकिस्तान सरकारला मिळतील. बाकीचे हिंदुस्थान सरकारास रहातील.

**मुंबई सरकारनें कर्ज मागितलें**—मुंबई सरकारनें आपली घरें बांधण्याची योजना पुरी करण्यासाठी हिंदुस्थान सरकारकडे चार कोटि रुपयांचें कर्ज मागितलें आहे.

**पाकिस्तानला झेकोस्लोव्हाकिआची मदत**—पाकिस्तानांत कांहीं उद्योगधंदे व कारखाने उभारण्याच्या कामीं झेकोस्लोव्हाकिआंतील कारखानदार मदत करणार आहेत असें समजतें. पाकिस्तानांतील कामगारांना झेक तज्ज्ञ शिक्षण देऊन तयार करणार आहेत. हे कामगार तयार झाले म्हणजे मग पाकिस्तान सरकार कारखाने आपल्या ताब्यांत घेणार आहे.

**पाकिस्तानांत इजिप्तचें भांडवल**—पूर्व पाकिस्तानांत पाकिस्तान आणि इजिप्त ह्यांच्या संयुक्त भांडवलाची एक तागाची गिरणी काढण्याचें घाटत आहे. ही गिरणी चालू झाल्यावर तिचें सर्व उत्पादन इजिप्तला पाठविण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें, इजिप्शिअन विमा कंपन्यांच्या शाखा पाकिस्तानांत काढण्यासंबंधींही वाटाघाटी चालू आहेत, असें समजतें.


तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील- सुती – गरम – रेशमी —खादीचें माहेरघर—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २५ ऑगस्ट १९४८


संस्थापक
प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे
वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

## रेल्वे वहातुकींत सुधारणा

हिंदच्या मालकीच्या रेल्वे रस्त्याची लांबी २४,५६५ मैल असून पाकिस्तानची रेल्वे ६,७४८ मैल आहे. रेल्वे आतां मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत आलेल्या आहेत व भांडवलाचेंहि बरेचसें हिंदीकरण झालें आहे. हिंदच्या रेल्वेजची भांडवली किंमत ६७८ कोटी रु. असून, चालू वर्षअखेर 'रेल्वे रिझर्व्ह फंडा'ची रक्कम अगदींच अपुरी आहे.

रेल्वेजचा उपयोग उतारू व माल ह्यांची अंतर्गत वहातूक, यासाठी होतो. वहातुकीच्या अर्थव्यवस्थेला अतिशय महत्त्वाचें साधन म्हणून रेल्वेजचा विचार टाटा–बिर्ला योजना किंवा इतर पुनर्घटनेच्या योजनांमध्यें व्हावयास पाहिजे होता परंतु तसा तो कोठेंच झालेला दिसत नाहीं. उतारूंची माफक दरांत वहातूक करणें, सर्व प्रकारच्या मालाची अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापारासाठी वहातुक करणें, लष्करी संरक्षणाच्या दृष्टीनें सैन्याची वहातूक करणें, युद्धाच्या किंवा संरक्षणाच्या दृष्टीनें महत्त्वाचीं ठिकाणें जोडणें, प्रवासाला उत्तेजन देणें, दुष्काळी परिस्थितींत वहातुकी-साठीं विशेष रीतीनें उपयोगी पडणें, उत्पादनाचीं केंद्रें व बाजार-पेठा जोडणें, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं ठिकाणें प्रवासाला सहज-सुलभ करणें, इ. अनेक गोष्टींची रेल्वेजकडून अपेक्षा केली जाते व रेल्वेखातें हें 'सार्वजनिक उपयुक्ततेची' बाब म्हणून समजली जाते. तेव्हां रेल्वेजचा कारभार सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें व देशाच्या अर्थव्यवहाराला पोषक होईल अशा प्रकारें होणें आवश्यक आहे.

परंतु आपल्या देशांत परकी राज्यव्यवस्थेचे खाली, विशेषत: सैन्याच्या हालचालींना उपयोगी व संरक्षण ह्या दृष्टीनें रेल्वेज बांधल्या गेल्या. कच्च्या मालाची निर्गत व पक्क्या मालाची आयात ह्या दृष्टीनें रेल्वेचे फाटे प्रसृत करण्यांत आले. परकी भांडवलाला रेल्वेमध्यें पैसा गुंतविण्यासाठी आकर्षक सवलती देण्यांत आल्या. रेल्वेचा कारभार परकीयांच्या हातीं राहिला व उच्च दर्जाच्या सर्व जागा परकीयांनाच देण्यांत आल्या. रेल्वेकारभारावर सामान्य जन-तेचें मुळींच नियंत्रण नव्हतें. अंतर्गत वहातूक व व्यापार यासाठीं तरतूद करणें ही दृष्टि रेल्वेखात्यानें ठेवली नाहीं. सामान्य जनतेच्या म्हणजे तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या सुखसोई पुरविणें ही गोष्ट रेल्वे अधिकाऱ्यांना कधींहि कार्यप्रवृत्त करीत नसे. परकी भांडवल, परकीयांची व्यवस्था, पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या उतारूंचीच व्यवस्था, परकी नोकरवर्ग, रेल्वेला लागणाऱ्या सर्व साहित्याचा परदेशांतून पुरवठा, अंतर्गत प्रवाशी व व्यापारी गरजांबद्दल बेफि-कीरपणा इ. गोष्टींविषयीं रेल्वेखात्याचा कारभार प्रसिद्ध होता. गेलीं कांहीं वर्षें या परिस्थितींत सभोंवतावरच्या वातावरणाच्या दड-पणामुळें थोडा फरक होत आहे. आतां स्वातंत्र्य मिळालें आहे तरी पूर्वपरंपरेनें बद्धमूल झालेल्या गोष्टी सुधारणें बरेंच कठीण आहे. जणूं कांहीं परंपरेनें कारभाराची एक पद्धति रूढ झाली आहे. ही पद्धति आतां जबाबदारीच्या काळांत आमूलाग्र बदलणें आवश्यक आहे. यासाठी रेल्वे कारभाराचा कायापालट झाला पाहिजे. हिंदच्या रेल्वे ह्या सामान्य जनतेच्या सुखसोईसाठी व अंतर्गत व्यापारा-साठीं आहेत; व ह्या दृष्टीनें रेल्वेखात्याचा कारभार आपल्या अर्थव्यवस्थेला पोषक झाला पाहिजे. कार्यक्षमता वाढविण्याचे सर्व मार्ग अवलंबिले पाहिजेत. तिकिटाशिवाय प्रवास करणारांच्या प्रचंड संख्येला त्वरित आळा घातला पाहिजे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंच्या सामान्य सोईकडे लक्ष पुरविलें पाहिजे. विद्यार्थ्यांना प्रवासासाठी सवलती दिल्या पाहिजेत.

परिस्थितीच्या दडपणामुळें रेल्वेकारभारांत पुढील सुधारणा झालेल्या आहेत. पहिल्या महायुद्धानंतर मोटारींची अंतर्गत वहातूक फार वाढली. पुढें मंदीच्या काळांत रेल-रोड स्पर्धेचा प्रश्न उपस्थित झाला. कांहीं ठिकाणीं स्वस्त जल–वहातूकहि अप्रत्यक्ष रीतीनें रेल्वेला जाणवली. यामुळें कारभाराच्या कांहीं प्रश्नांवर लक्ष वळलें. विशेषत: १९२३ नंतर संरक्षणामुळें टाटांच्या कारखान्यांतील कांहीं माल रेल्वेच्या बांधकामांत वापरला जाऊं लागला. उतारू व व्यापारीसंघ यांच्याकडून अनेक तक्रारी केल्या गेल्या किंवा मागण्या केल्या जात. यांचा विचार कांहीं वेळां तरी रेल्वे खात्याला करावा लागला. १९२० नंतर प्रातिनिधिक कायदेमंडळांची वाढ झाल्यामुळें त्याचाहि रेल्वेच्या कारभारावर थोडासा परिणाम झाला. मजूर वर्गातील जागृति ही गोष्टहि नोकरवर्गाच्या दृष्टीनें थोडासा परिणाम करणारी झाली.

सांप्रत रेल्वेच्या कारभारांतील पुढील गोष्टींत त्वरित सुधारणा होणें कार्यक्षमतेच्या दृष्टीनें इष्ट आहे. माल व उतारू यांची संख्या वाढत जात आहे. परंतु वॅगन्स व इंजिनें यांचा तुटवडा असल्या-मुळें वहातूक होऊं शकत नाहीं. इंजिनें मिळविण्यासाठी खुद्द रेल्वे कमिशनरनाहि परदेशांत जाऊन विशेष प्रयत्न करावे लागतात. रेल्वे बेजटमध्यें जाहिर केल्याप्रमाणें येथील कारखान्यांत त्वरित इंजिनांचें बांधकाम सुरू झालें पाहिजे. वॅगन्सहि जास्त प्रमाणांत बांधल्या पाहिजेत. वॅगन्स रिकाम्या करून परत वहातुकीसाठी उपयोगांत आणणें या कामांत मुळींच विलंब होतां कामा नये. या बाबतींत होणारी दिरंगाई वहातुकीवर अनिष्ट परिणाम करते. रेल्वेखात्याच्या खर्चाचें प्रमाण ८४ टक्के आहे. हें प्रमाण वाजवी-पेक्षां जास्त आहे. कांहीं वेळां व कांहीं ठिकाणीं खर्चाचें प्रमाण ६१ टक्के (उत्पन्नाशीं तुलना करतां) होतें. तेव्हां खर्चाचें प्रमाण कमी झालें पाहिजे. विमानांची गेल्या दोन वर्षांपासून वाढत जाणारी वहातुक रेल्वेना जाणवेल. कारण, पहिल्या वर्गाचे दर गेल्या वर्षी बरेच वाढविल्यामुळें, शक्य तेव्हां लोक विमानानेंच प्रवास करतील. जरूर तर पहिला वर्ग अजिबात रद्द करणें फायदेशीर ठरेल. गाड्यांच्या वक्तशीर येण्याजाण्याचें प्रमाण १९३७ सालीं ८६ टक्के होतें, १९४७ सालीं ६४ टक्के झालें. अर्थात हें सुधारलें पाहिजे. रिझर्व्ह फंड कितीतरी पटीनें वाढविला पाहिजे. तिकिटाशिवाय प्रवास बंद झाला पाहिजे. अपघातांचें प्रमाण कमी झालें पाहिजे. जुनीं इंजिनें काढून नवीन सुरू केलीं पाहिजेत. अशा अनेक मार्गांनीं रेल्वेना कारभार सुधारूं शकेल.

# सरकारी धान्य दुकानांची कामगिरी

## वाढत्या महागाईस आळा

जानेवारी १९४८ पासून मुख्य अन्नधान्यांच्या घाऊक किंमतींचा निर्देशांक वर चढूं लागला होता. जूनच्या शेवटीं तो २६७ होता. जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत तो २५८ पर्यंत खाली उतरला. जुलैमध्यें मुंबई सरकारचीं स्वस्त धान्याचीं दुकानें मोठ्या प्रमाणावर सुरू झालीं. त्यामुळें मुंबई प्रांतांतील धान्याच्या किंमती वाढण्याचें तर थांबलेंच, पण उलट त्या उतरूं लागल्या. दरवर्षी ह्या सुमाराला किंमतींचा वाढण्याकडे कल असतो. खालील तक्त्यांत मुंबई प्रांतांतील मुख्य अन्नधान्याच्या घाऊक सरासरी किंमती व त्यांचा निर्देशांक दिला आहे. किंमती बंगाली मणाच्या आहेत.

| | तांदूळ | गहूं | ज्वारी | बाजरी | संयुक्त निर्देशांक |
|---|---|---|---|---|---|
| | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | |
| नियंत्रण उठण्यापूर्वी | १२–६–१ | ११–१२–२ | ७–०–५ | ७–६–७ | |
| | (१००) | (१००) | (१००) | (१००) | (१००) |
| एप्रिल १९४८ ची सरासरी | ३२–१४–११ | २८–१३–० | १२–१०–४ | १५–७–१० | |
| | (२६६) | (२४५) | (१८०) | (२०९) | (२३२) |
| मे १९४८ ची सरासरी | ३५–६–६ | २९..६–५ | १३–११–३ | १६–२–६ | |
| | (२८६) | (२५०) | (१९५) | (२१८) | (२४७) |
| जून १९४८ ची सरासरी | ३७–१०–२ | २९–१५–१० | १४–८–८ | १६–१५–७ | |
| | (३०४) | (२५५) | (२०७) | (२२९) | (२६०) |
| ३–७–४८ | ३८–१२–० | ३०–११–२ | १४–१३–२ | १७–४–४ | |
| | (३१३) | (२६१) | (२११) | (२३३) | (२६७) |
| १०–७–४८ | ३८–१२–० | ३०–७–४ | १४–१०–११ | १७–३–२ | |
| | (३१३) | (२५९) | (२०९) | (२३२) | (२६६) |
| १७–७–४८ | ३८–२–१ | ३०–३–७ | १४–७–७ | १६–१५–७ | |
| | (३०८) | (२५७) | (२०६) | (२२९) | (२६२) |
| २४–७–४८ | ३७–६–३ | २९–१४–० | १४–४–२ | १६–१२–० | |
| | (३०२) | (२५४) | (२०३) | (२२६) | (२५८) |

### पौंडी गंगाजळीवरील टांगती तलवार

हिंदच्या पौंडी गंगाजळी संबंधानें लिहिलेल्या एका अग्रलेखांत इंग्लंडमधील 'फिनॅन्शिअल टाइम्स' नें असें म्हटलें आहे कीं पौंडी गंगाजळी कमी करण्यांत येणार नाहीं ह्या सर षण्मुखम् चेट्टींच्या ठाम विधानाला हरकत घेतली पाहिजे. ह्या नियतकालिकाच्या मतें, नुकत्याच झालेल्या वाटाघाटींत सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं तसें आश्वासन दिलेलें नाहीं. ह्याच अग्रलेखांत पुढें असें म्हटलें आहे :--" हिंद हा देश ब्रिटनचा धनको आहे. हिंदशीं वाटाघाटी करतांना ब्रिटननें बराच उदारपणा दाखवला आहे. ब्रिटनवर हिंदुस्थानचे असलेले हक्क केवळ आर्थिक दृष्टीनें पहातां बरेच आहेत. तथापि, नैतिक दृष्टीनें मात्र ते तितकेसे समर्थनीय नाहींत. राजकारणी पुरुषांचे विचार व शब्द कांहींही असोत; देणें देण्याची समर्थता हाच अखेर निर्णायक मुद्दा असतो. पौंडी गंगाजळीचें देणें कमी करण्याची शक्यता नाहींशी झालेली नाहीं. तशी शक्यता नसेल तर ब्रिटनची दुःस्थितींतून उठण्याची शक्यताही त्याच बरोबर नष्ट होईल, असें म्हणावें लागेल. " हिंदच्या इंग्लंडमधील पौंडी गंगाजळीबद्दल चर्चा सुरू झाल्यापासूनच ही गंगाजळी सर्वच्या सर्व न मिळतां कांहीं प्रमाणांत कमी करण्यांत येईल कीं काय अशी भीति निर्माण झाली होती. इंग्लंडमधील हुजूर पक्ष आज अधिकारपदस्थ नसला, तरी त्या पक्षाचे पुढारी मि. चर्चिल ही कपात संधि आल्याबरोबर नेहमींच सुचवित आले आहेत. हिंदच्या गंगाजळींत कपात होणें इंग्लंडच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून आहे हें खरें. पण ह्याला उपाय इंग्लंडनें सर्व कर्ज फेडण्यासाठीं आपली शक्ति वाढविणें हाच आहे. अमेरिकेच्या मदतीनें ब्रिटिश उद्योगधंद्यांची पुनर्घटना करण्याचें ठरलें आहे. तसें झालें तर हिंदुस्थानला त्याचा फायदा मिळूं शकला पाहिजे.

### आस्ट्रेलियन बँकांचें राष्ट्रीयीकरण—हायकोर्टाची आडकाठी

खासगी मालकीच्या बँका सरकारी मालकीच्या करण्यासाठी ऑस्ट्रेलियन सरकारनें गेल्या ऑक्टोबरमध्यें कायदा केला. परंतु, त्या कायद्याचीं कांहीं कलमें तेथील हायकोर्टानें बेकायदा ठरविलीं आहेत; आणि कायदा अंमलांत न आणण्याबद्दल सरकारला ताकीद दिली आहे. हायकोर्टाच्या सहा न्यायाधीशांपैकी फक्त एका न्यायाधीशाच्या मतें बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा अधिकार ऑस्ट्रेलियन सरकारला आहे.

### न्यू सिटिझन बँकेची शिवाजीनगर शाखा

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. ची शिवाजीनगर शाखा तिच्या स्थापनेपासून जंगली महाराज रोडवर "विश्वकुंज" बंगल्यांत होती. ती १५ ऑगस्टच्या स्वातंत्र्यदिनाचे सुमुहूर्तावर १२८८, शिवाजीनगर, घोले चौक, केंजळे बिल्डिंग, येथें नेण्यांत आली. त्या निमित्त बँकेनें सकाळीं पानसुपारीसमारंभ घडवून आणला. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डी. डी. देशपांडे, हे स्वतः पाहुण्यांचें स्वागत करीत होते.

### श्री. षण्मुखम चेट्टींचा राजीनामा

इनकम टॅक्स चुकविणारांची चौकशी करण्यासाठी नेमण्यांत आलेल्या कमिशनकडे जीं प्रकरणें पाठविण्यांत आलीं, त्यांपैकी चार प्रकरणें अर्थमंत्र्यांनीं परत मागवून कमिशनच्या कक्षेंतून काढून टाकलीं. त्यांचा हेतु निर्मळ असला तरी सार्वजनिक नितिमत्तेच्या दृष्टीनें त्यांनीं राजीनामा देणें इष्टच होतें असें मत व्यक्त करून पंतप्रधानांनीं तो स्वीकारला आहे. कायमच्या अर्थमंत्र्याची नेमणूक होईपर्यंत त्यांचें काम श्री. नियोगी हे पहातील.

# शेतकी पतीची पुनर्घटना

## सहकारी चळवळीचें भावी स्वरूप काय राहील ?

(लेः-श्री. य. वृ. खोले)

१९४४ सालीं हिंदुस्थान सरकारनें प्रि. ध. रा. गाडगीळ, ह्यांचे अध्यक्षतेखालीं शेती कर्जपुरवठा समिती नेमली. ह्या समितीकडे शेतकऱ्यांस सध्यां असलेलें कर्ज कसें कमी करतां येईल व अल्प व लांब मुदतीचीं कर्जे नियमित व्याजाच्या दरानें व कार्यक्षम पद्धतीनें कशीं देतां येतील त्याबाबत अभिप्राय मागितला. समितीनें आपला अहवाल तयार करून सरकारकडे सादर केला व तो प्रसिद्ध केल्यानंतर त्यावर प्रांतिक सरकारें, सहकारी कार्यकर्ते व परिषदा ह्यांनीं विचार करून पुढील पाऊल टाकण्यासंबंधींहि विचार विनिमय केला.

### गाडगीळ समितीची मुख्य शिफारस

आर्थिक पुनर्घटना यशस्वी होण्यासाठी शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनाशीं निगडित असलेले सर्व प्रश्न ह्यांचाही विचार साकल्यानें व्हावा, असें गाडगीळ समितीनें प्रथम नमूद केलें आहे. पैसा पुरविण्यासाठी कार्यक्षम अशी संघटना निर्माण करणें हा पुनर्घटनेचा महत्त्वाचा भाग आहे. पुनर्घटनेंत ज्या अनेक गोष्टी आहेत, त्यांमध्यें शेतकी व औद्योगिक कामास लागणारें मनुष्यबळ, आर्थिक दृष्ट्या आवश्यक तेवढी जमीन धारण करणें, उत्पादनाचे बाबत संरक्षण, तांत्रिक सल्लामसलत, हमखास पाणीपुरवठा, शेती मालाची किंमत ठरविणें, पूरक असे दुय्यम धंदे, शिक्षणाचा फैलाव वगैरेंचा समावेश करतां येईल. शेतीपतीची पुनर्घटना करताना ह्याबाबत काय करणें आवश्यक आहे ह्याचा विचार व्हावा. किंबहुना, ह्याबाबत आवश्यक तेवढी तयारी सरकारनें करून ह्याबरोबरच शेतकऱ्यांस लागणाऱ्या पैशासंबंधीं व्यवस्था करावी, असाच समितीचा अभिप्रेत अर्थ दिसतो.

### शेती उत्पादनास आवश्यक गोष्टी

शेतकऱ्यांस आपल्या जमिनींत मेहनत करून ज्यास्तींत जास्त पीक काढणें असल्यास, त्यास योग्य असें वातावरण निर्माण व्हावयास पाहिजे. त्याचप्रमाणें, योग्य व पुरेशी जमीन, पाण्याचा व खताचा पुरवठा, शेतीमालाच्या निश्चित किंमती, व उत्पादनासाठी लागणारें कर्ज नियमित व हलक्या व्याजानें मिळण्याची व्यवस्था, ह्या गोष्टी आवश्यक आहेत. देशांत शेतकऱ्यांच्या कर्जाच्या गरजा भागविणाऱ्या तीन प्रकारच्या सोयी आहेत. (१) सरकार तगाईरूपानें देत असलेली मदत; (२) दुसरी सहकारी संस्थांमार्फत मिळणारीं कर्जे व (३) खाजगी सावकाराकडून मिळणारीं कर्जें. ह्या सर्व पद्धतींत कांहीं दोष असून त्यामुळें शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कायमचा कमी होण्यास मदत झाली नाहीं असें अनुभवावरून म्हणण्यास हरकत नाहीं.

### जुनें कर्ज कमी करणें

शेतकऱ्यावरील कर्जाचा बोजा आज त्यास त्याची फेड करून कमी करणें शक्य नाहीं असें समजलें जातें. आज असलेलें कर्ज त्याच्या परतफेडीच्या प्रमाणांत कायद्यानेंच कमी करून त्यास कर्जमुक्त करणें व त्यास नवीन लागणारें कर्ज उत्पादक कामासाठी एकाच पैसा पुरविणाऱ्या संस्थेमार्फत कमी व्याजानें त्याचे परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें देणें हा एक शेतीपुनर्घटनेचा मुख्य कार्यक्रम समजला पाहिजे. त्या धोरणास अनुसरून पुष्कळशा प्रांतिक सरकारांनीं ऋणविमोचन कायदे पास करून घेतले असून जुनीं कर्जें कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. अशा कर्जमुक्त होऊं इच्छिणाऱ्याकरितां "पीक कर्ज" देण्याची व्यवस्था केली आहे. सरकारी चक्रामधून किती काळांत असे शेतकरी कर्जमुक्त होतील हें आज सांगणें कठीण आहे.

### आर्थिक व्यवहारावरील नियंत्रण

सरकारनें कर्जदार शेतकऱ्याचें कर्ज कमी करून त्यास नवीन लागणारी आर्थिक मदत सहकारी संस्था, सरकार, व नियंत्रणाखालील असलेले सावकार यांजमार्फत केली आहे. सावकार कायद्यान्वयें व ऋणविमोचन कायद्यान्वयें द्यावयाचा पैसा विशिष्ट पद्धतीनें व ठराविक व्याजानें देण्याची सोय करण्याचा सरकारनें निश्चय करून त्याप्रमाणें कायद्यांत तरतूद केली आहे. परंतु त्या बरोबर हा पैसा कसा व कोणत्या संस्थांमार्फत पुरवावा हा प्रश्न समाधानकारक रीतीनें सोडविणें, हें काम फार मंदगतीनें सुरू आहे व त्यामुळें आर्थिक गरज पार पाडण्यास अडचण भासूं लागली आहे. सावकारी नियंत्रण कायद्यान्वयें आवश्यक लागणारें लायन्सेस खाजगी सावकार घेण्यास नाखुष असून संयुक्त भांडवली बँकाही आपला व्यवहार कांहीं विशिष्ट पद्धतीनें करीत असल्यानें सहकारी संस्था अगर सरकारनिर्मित भांडवल पुरविणाऱ्या संस्था यांजकडे हें काम सोपविण्याचा विचार क्रमप्राप्त झाला. अर्थशास्त्रज्ञ यांचे सर्वसाधारण मत असें दिसतें कीं, जर देशास आर्थिक परिस्थितींत सुधारणा करून आंतरराष्ट्रीय जीवनांत तग धरावयाचा असेल, तर नियोजनाचा कार्यक्रम पत्करणें जरूर आहे. नियोजन यशस्वी व्हावयाचें असेल तर देशानें उत्पादन व त्याचें वाटप या सर्वांवर नियंत्रण पत्करणें जरूर आहे. त्या दृष्टीनेंच शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कायद्यानें कमी करून त्यास त्यांतून मुक्त करणें व त्याच्या आर्थिक गरजा त्यास आवश्यक त्या वेळीं ठराविक पद्धतीनें व त्याच्या परतफेडीच्या ऐपतीप्रमाणें व्याजानें व सोईस्कर अशा परतफेडीच्या हप्त्यानें भागविणें आवश्यक आहे. असा सिद्धांत मांडतांना, प्रि. ध. रा. गाडगीळ यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीनें त्या कार्यासंबंधीं आपल्या रिपोर्टांत खुलासा करतांना पुढीलप्रमाणें म्हटलें आहे:—

"शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्याचे मार्ग सुचविण्याचा आणि पुढें त्यांस पैशाचा पुरवठा योग्य रीतीनें होत राहील अशा प्रकारच्या योजनेचा आराखडा तयार करण्याचा विकट प्रश्न कमिटीस सोडविण्याचा आहे." आणि या दृष्टीनें समितीनें सर्व बाजूनें विचार करून याबाबत आपला अभिप्राय दिला आहे. त्याचा विचार करतांनाच सहकारी चळवळीचें भावी स्वरूप काय राहील याचा ओघानेंच विचार करणें आवश्यक आहे.

### गाडगीळ समितीच्या सूचना

मुंबई प्रांतापुरता विचार करावयाचा झाल्यास, सहकारी चळवळीचें भावी स्वरूप बरेंचसें बदलणार आहे हें निश्चित. त्यासंबंधीं बरेच विचारप्रवाह चालू असून याबाबत उलट सुलट अशी टीका वर्तमानपत्रें, परिषदा यांमधून व्यक्त झाली असून अद्यापहि होत आहे. कांहीं टीका व्यक्तिगत व गाडगीळ समितीचे अध्यक्ष प्रि. ध. रा. गाडगीळ यांजवरही होत आहे. अर्थात् प्रस्तुत लेखांत

टीकेचा परामर्श घेण्याचा अगर त्यासंबंधींची एखादी बाजू मांडण्याचा येथें विचार नसून ह्या नवीन सहकारी संघटनेचें स्वरूप काय राहील, याचा विचार करावयाचा आहे. गाडगीळ समितीनें तिचेकडे सोपविलेल्या प्रश्नांचा आपल्या दृष्टीनें विचार केला व सूचना केल्या. पहिला प्रश्न शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी करण्याचा होता व त्यांत कमिटीचे मतें लहान लहान शेतकरी यांना वाढत्या किंमतीचा फायदा मिळून आश्चर्यकारक असें आपलें कर्ज कमी करतां आलें नाहीं. उलट मोठ्या शेतकऱ्यांनीं आपलें सर्व कर्ज अगर मोठ्या प्रमाणांत कर्ज कमी केलें असें दिसतें असा आपला अभिप्राय नमूद केला आहे. लहान शेतकऱ्यांच्या कर्जाचा बोजा कमी करण्याचे प्रयत्न पुष्कळशा प्रांतांनीं हातीं घेतले आहेत. परंतु त्याबाबत शक्य तितक्या लवकर व्यवस्था होऊन शेतकरी कर्जमुक्त झाला पाहिजे व पुन्हां तो कर्जबाजारी होणार नाहीं अशीही तरतूद करण्याची शिफारस समितीनें केली आहे. दुसरा प्रश्न कर्ज कमी करण्याचें काम झाल्यावर शेतकऱ्यांना लागणाऱ्या आर्थिक गरजा पुरविण्याचा व त्यासाठी प्रांतांतून एक सरकारनिर्मित संस्था असावी अशी समितीची शिफारस आहे.

या शिफारशीप्रमाणें व त्याचे आधींच मुंबई इलाख्यापुरतें बोलावयाचें झाल्यास ज्यांचें कर्ज कायद्यान्वयें कमी व्हावयाचें आहे, त्यांना कर्ज चौकशी मुदतीचे काळांत व नंतर लागणारें कर्ज पिकाचे तारणावर सहकारी संस्था व सरकारकडून मिळण्याची व्यवस्था झाली आहे व ती मान्यही झाली आहे. अर्थात् या व्यवस्थेचा एकंदर परिणाम काय झाला किंवा होईल हें अद्याप कळावयाचें आहे. परंतु एक गोष्ट निश्चित दिसत आहे कीं असें कर्ज देण्याचे पूर्वी सरकारनें शेतकऱ्यांनीं उत्पादन केलेल्या मालाच्या किंमती निश्चित करून त्यास किमान किंमत देण्याची हमी घेतल्याशिवाय हा प्रयोग यशस्वी होईल असें वाटत नाहीं. नियंत्रिणें उठविल्याबरोबर कांहीं मालांच्या किंमती वाढल्या त्याबरोबर गुळासारख्या किंमती घसरल्या. तेव्हां शेतकऱ्यांची कर्जफेडीची ऐपत ठरविणें झाल्यास मालाच्या किंमती निश्चित कराव्या लागतील असें म्हणणें श्रेयस्कर व हितकारक आहे. गाडगीळ समितीनें शेतकऱ्यांना पैसा कसा व कोणत्या संस्थांमार्फत पुरवावा यासंबंधीं विचार करतांना तो तिनें एका प्रांतासाठीं न करतां सर्व प्रांतांसाठी केला असल्यानें तिनें कांहीं सर्वसाधारण शिफारशी करून त्याप्रमाणें व्यवस्था करण्याचा विचार प्रत्येक प्रांतावरच सोपविला आहे असें दिसतें. समितीनें आपल्या अहवालांत असें नमूद केलें आहे कीं शेतकऱ्यांना लागणारें कर्ज बहुंशीं खाजगी सावकारांकडून पुरविलें जात असुन त्यांच्या एकंदर व्यवहाराची पद्धति लक्षांत घेतां शेतकऱ्यांची उत्पादन शक्ति वाढण्याकडे त्याचा उपयोग होत नाहीं. समितीनें हेंही मान्य केलें आहे कीं, हा सावकारी व्यवहार एकदम दुसऱ्या एखाद्या संस्थेनें घेऊन त्याचा परिणाम सावकारावर जरी तांतडीनें झाला नाहीं तरी सुद्धां त्यांच्या पद्धतींत फरक होण्यास त्याची मदत होईल. समितीचे मतें, शेतकऱ्यास ज्यावेळीं आर्थिक गरज लागेल त्यावेळीं त्यास खात्रीनें व योग्य कारणाकरितां योग्य व्याजानें व अटीनें पैसा पुरविणारी एखादी सोय झाल्यास तिचे शेतकऱ्याकडून स्वागतच होईल. आणि म्हणूनच शेती-पैसा पुरवठ्याच्या पुनर्घटनेसाठी एखादी दुसरी व्यवस्था असणें अगत्याचें असल्याचें समितीनें नमूद केलें आहे.

### पैसा पुरविणारी संस्था

समितीनें वर नमूद केल्याप्रमाणें शेतकऱ्यांना पैसा पुरवणारी संस्था कशी व कोणती असावी यासंबंधीं विचार आपल्या अहवालांत विस्तृतपणें केला. या सूचनेबद्दल थोडासा मतभेद आहे असें दिसतें. स्वतंत्र अशी सरकार नियंत्रित संस्थेमार्फत हें काम करावें कीं सध्या अस्तित्वांत असलेल्या सहकारी संस्थांमार्फत काम करावें यासंबंधीं समितीनें विचार केला असून आपला अभिप्राय नमूद केला आहे. प्रथमतःच समितीनें असें नमूद केलें आहे, कीं तात्विक दृष्ट्या पैसा पुरविणारी नुमनेदार व्यवस्था सहकारी चळवळी मार्फतच होईल. परंतु सध्याच्या सहकारी चळवळीची व्याप्ती व त्या चळवळींतील कार्यकर्ते यांची सहकारी संस्थांसंबंधींचीं मतें विचारांत घेतां सहकारी चळवळीचें आजचें स्वरूप बदलल्याशिवाय हें काम तिचेकडे सोपविणें अडचणीचें होईल.

गाडगीळ समितीस, तत्त्वतः हें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावें हें जरी मान्य असलें, तरी त्या चळवळीचें आजचें स्वरूप, तिची स्वायत्तता अगर स्वातंत्र्य हीं कायम ठेवून चालणार नाहीं असा स्पष्ट इषारा तिनें आपल्या अहवालांत नमूद केला आहे. सदर अहवालांत असेंही नमूद केलें आहे कीं सर्वच प्रांतांत सहकारी चळवळ मजबूत पायावर उभी आहे असें नाहीं. शिवाय, सहकारी संस्थांची जीं आद्य व पुरातन तत्त्वें म्हणजे स्वायत्तता, त्यांची त्यांचे सभासदांकडून होणारी देखरेख, व या संस्थांवर होणारी सरकारी अप्रत्यक्ष देखरेख याचा विचार करतां, सरकारी धोरणाचा पाठपुरवठा करून त्याची अंमलबजावणी करावयाची झाल्यास सहकारी चळवळींच्या स्वायत्ततेस बाध येणार हें निश्चित व यासाठी सर्व प्रश्नांचा विचार करून समितीनें प्रांतासाठी सरकारनिर्मित अशी पैसा पुरवणारी संस्था सुरवातीस तरी असावी व ज्या ठिकाणीं सहकारी चळवळ उच्च दर्जास गेली असेल तेथें तें काम सहकारी चळवळीमार्फत होण्यास हरकत नाहीं, असें नमूद केलें आहे.

गाडगीळ समिती प्रमाणेंच नानावटी समितीसही नवीन काम सहकारी चळवळी मार्फत करतांना येणाऱ्या संभाव्य अडचणींची जाणीव होती, असें तिनें आपल्या अहवालांत नमूद केल्यावरून दिसत आहे. ( पा. नं ४५, प्यारा ३. ) परंतु तिनें हें काम सहकारी चळवळी मार्फत कां व्हावें याचा विचार करतांना जी मुख्य गोष्ट दृष्टीपुढें ठेवली आहे असें दिसतें ती ही कीं ग्रामीण जीवनाशीं समरस झालेली अगर तिचेपर्यंत पोहचणारी अशी ही सहकारी चळवळ असल्यानें नवीन योजना लवकर यशस्वी होईल. सरकारनिर्मित अशी संस्था अस्तित्वांत आल्यास तिचेकडून अपेक्षेप्रमाणें काम होण्यास अवधी लागेल. गाडगीळ समितीनें दोन स्पष्ट मार्ग दाखविले होते. एक, सरकार नियंत्रित अशी कर्ज पुरवणारी संस्था अस्तित्वांत आणणें व दुसरा सहकारी चळवळीची पुनर्घटना करून नियंत्रित अशी कर्ज पुरविणारी व्यवस्था आस्तित्वांत आणणें.

### सहकारी कार्यकर्त्यांचे विचार


सहकारी कार्यकर्त्यांनीं गाडगीळ समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर त्या संबंधीं तातडीनें विचार करून आपलीं मतें सरकारास आपणहून अगत्यानें कळवून, मुंबई प्रांतापुरतें हें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावें, असा अभिप्राय व्यक्त केला आणि कामाच्या तपशीलासंबंधीं विचार करण्यासाठी एक समिती नेमण्याची शिफारस केली. गाडगीळ समितीच्या शिफारशींचा विचार करतांना सहकारी कार्यकर्त्यांना मुख्य भीति—साधार—अशी वाटत होती कीं, जर मुंबई प्रांतासाठी स्वतंत्र अशी पैसा पुरविणारी सरकार निर्मित संस्था अस्तित्वांत आली, तर ती सहकारी चळवळीस घातुक होईल व सर्व ऐपतदार शेतकरी

कर्जासाठी या नवीन संस्थेकडेच जाऊन फक्त ज्यांना दुसरीकडे कर्ज मिळण्याची शक्यता नाहीं असे उरलेले शेतकरी तेवढे सहकारी चळवळीकडे येतील. मुंबई प्रांतातील सहकारी चळवळीची वाढ लक्षांत घेतां हें काम सहकारी चळवळीनें हातीं घेण्यास हरकत नसल्याचें कार्यकर्त्यांना वाटलें. शिवाय त्यांचा असा दृढ समज, कीं सरकार ज्या सवलती अगर मदत नवीन क्रेडिट कार्पोरेशनला देईल, त्याच सवलती व मदत सहकारी चळवळीसहि देईल. त्यामुळें हें काम घेणें योग्यच ठरेल. या प्रश्नांचा विचार करतांना सहकारी संस्थांचें आजचें स्वरूप व त्यांची स्वायत्तता ह्या संबंधीं कांहीं विचार झाला किंवा नाहीं हें कळण्यास मार्ग नाहीं. तथापि, जर सहकारी कार्यकर्त्यांनीं पूर्ण विचारांतीं सर्व प्रश्नांचा विचार करून आपला निर्णय घेतला असेल, तर आतां त्याबद्दल टीका करण्यांत अर्थ नाहीं. गाडगीळ समितीनें एक मुख्य गोष्ट नजरेपुढें ठेवून, पैसा पुरविणारी संस्था कशा स्वरूपाची असावी याची रूपरेषा दिली व त्याप्रमाणें जर सहकारी चळवळीचें स्वरूप बदलून नवीन काम सहकारी चळवळीमार्फत व्हावयाचें आहे, तर तिचे घटनेमध्यें मूलभूत असे फरक होणें क्रमप्राप्तच आहे.

### सहकारी चळवळीचें संभाव्य स्वरूप

सहकारी कार्यकर्त्यांच्या शिफारशीस, सरकारनें कोणत्याही तऱ्हेचा उशीर न लावतां, मान्‌ देऊन एक समिति नेमली. या समितीकडे मुंबई बँकस्‌ असोसिएशनच्या शिफारशीचा विचार करण्याचेंही काम सोपविलें. समितीनें एक प्रश्नावली तयार करून ती जिल्हा मध्यवर्ती बँका, बँकस्‌ असोसिएशन व इतर कांहीं कार्यकर्ते यांजकडे पाठवून, कांहीं साक्षी घेऊन, आपला अभिप्राय व्यक्त केला. ह्या समितीचे अध्यक्ष सर मणिलाल नानावटी होते. ह्या समितीनें शेतकऱ्यांस पैसा पुरविण्याचें काम चळवळीमार्फत व्हावें असा आपला अभिप्राय देऊन, सहकारी संघटनेमध्यें फेरफार सुचविले. तपशीलाबाबत या समितीच्या सूचना स्पष्ट नसल्यानें, त्याबाबत पुन्हां बँकस्‌ असोसिएशन व सरकार ह्यांमध्यें विचारविनिमय होऊन सरकारनें आपला अभिप्राय व्यक्त केला. त्यासंबंधींची माहिती सर्व सहकारी बँकांना देऊन ह्या नवीन योजनेप्रमाणें काम करण्यास मान्यता आहे किंवा नाहीं ह्यासंबंधींची विचारणा मध्यवर्ती व जिल्हा बँकांकडे केली आहे.

नवीन सहकारी व्यवस्थेंत सर्व सहकारी चळवळींवर नियंत्रण करणारी अधिकृत संस्था, म्हणून प्रांतिक सहकारी बँक समजण्यांत येणार आहे. प्रांतांतील सर्व सहकारी संस्थांवर देखरेख करणारी व शेतकऱ्यांना लागणाऱ्या कर्ज पुरवठ्याची व्यवस्था करणारी मध्यवर्ती संस्था म्हणून प्रांतिक सहकारी बँक रहाणार, हें निश्चित. जिल्हा बँकांवर व त्यांचे कर्ज वाटपावर ह्या बँकेचें नियंत्रण राहील. यापुढें त्यांत काय फरक होतील हें आजच निश्चित सांगतां आलें नाहीं, तरी प्रांतिक सहकारी बँकेस सहकारी चळवळींत मोठें स्थान प्राप्त झालें असून सहकारी खातें व सरकार आतां सहकारी चळवळी वरील नियंत्रणें प्रांतिक बँकेमार्फत करणार हें उघड आहे. प्रांतिक बँकेची घटना बदलण्यांत येऊन तिचें संचालक मंडळ विस्तृत करण्यांत येणार आहे व त्यामध्यें प्रत्येक जिल्हा बँकेस एक प्रतिनिधी मिळणार असून सरकारचा एक प्रतिनिधी बोर्डावर राहणार आहे. जिल्हा बँकांवरही कदाचित् मध्यवर्ती बँकेचा प्रतिनिधी असण्याचा संभव आहे. सरकार जिल्हा बँकांना देणारी आर्थिक मदत प्रांतिक बँकेमार्फत देणार असून जिल्हा बँकांच्या भागांचे खरेदींत प्रांतिक बँकेस पैसा गुंतवितां येणार आहे. प्रांतिक बँकेप्रमाणें जिल्हा बँकांचे संचालक मंडळांत फेरफार करावा अशी सरकारची शिफारस आहे. जिल्हा बँकेचे संचालक मंडळांत सोसायटीचे निदान निम्मे प्रतिनिधी असावेत असा सरकारचा इरादा आहे. प्रांतिक बँक जें भाग भांडवल म्हणून जिल्हा बँकांना देईल त्यासाठी रु.२५ लाखांपर्यंत रक्कम व्याजानें सरकार प्रांतिक बँकेस देणार आहे. ज्या जिल्ह्यांत आज जिल्हा मध्यवर्ती बँका नाहींत तेथें त्या अस्तित्वांत आणण्याची खटपट व्हावी व तोंपर्यंत तेथें प्रांतिक बँकेच्या शाखांनीं काम करावें अशी योजना आहे. प्रांताच्या सहकारी चळवळीची घटना खालील प्रमाणें राहील:—




टीपः—ज्या ठिकाणीं बँकिंग युनिअन्स आहेत त्या ठिकाणीं त्यांचे संबंध जिल्हा बँकेशीच यावेत अशी अपेक्षा आहे.

### प्राथमिक सहकारी संस्था

प्राथमिक सहकारी संस्थेच्या घटनेबाबत सरकारची अपेक्षा अशी कीं, त्या आतां विविध कार्यकारी संस्था म्हणून राहतील. त्या नियमित अगर अनियमित जबाबदारीच्या राहतील, नाममात्र सभासदांची संख्या शक्य तेवढी कमी राहील व सहकारी प्राथमिक संस्थेच्या सभासदांचे संस्थेवर निर्बंध राहणार नाहींत. व्यक्तिगत सभासदांची कर्जमर्यादा सध्यांची आर्थिक परिस्थिति लक्षांत घेतां वाढविणेस हरकत नाहीं. मात्र मोठी रक्कम मोठ्या शेतकऱ्यांस कर्ज देण्यांत गुंतविली जाऊं नये अशी दक्षता घ्यावी असें सरकारनें नमूद केलें आहे. विशिष्ट कालांत व ठराविक पद्धतीनें सहकारी चळवळींत बरीच मोठी लोकसंख्या समाविष्ट करण्याची योजना आखण्यांत यावयाची आहे व त्यासाठीं कांहीं नवीन सहकारी संस्था अस्तित्वांत येतील व त्यांना लागणारा नोकर वर्ग शिक्षण देऊन तयार करणें व त्यावर देखरेख करणें याची व्यवस्थाही करावी लागेल. त्याचप्रमाणें प्राथमिक सहकारी संस्थांना पहिलीं १० वर्षें कांहीं ठराविक अटींवर आर्थिक मदत सरकार देण्याचा विचार करील. मोठ्या शेतकऱ्यांसाठी कांहीं विशिष्ट लेव्यांकरितां अगर तालुका निहाय सहकारी पत संघ काढण्याची शिफारस सरकारनें मान्य केली आहे. हे संघ नियमित जबाबदारीच्या तत्त्वावर नोंदले जातील. असे संघ काढण्याचा हेतू मोठ्या शेतकऱ्यांच्या गरजा लहान पतपेढ्यांमार्फत भागविणें अडचणीचें जाईल हा होय. शेतकऱ्यांना कर्ज तातडतोब मिळण्याची व्यवस्था होण्याचे दृष्टीनें सध्याची पद्धति लवचिक असावी व कॅशक्रेडिटची पद्धत जास्त प्रमाणांत अवलंबिली जावी अशी योजना आहे. प्राथमिक सोसायटीच्या सभासदांचे जिंदगीवर सोसायटीचा अग्रहक्क निर्माण करण्याची तरतूद सहकारी कायद्यांत केली आहे. सोसायटीकडील वसूल होण्यास मदत व्हावी म्हणून खास वसुली अधिकारी सहकारी खात्याचे दिमतीस देण्याबद्दलचा विचार चालू आहे.

### सोसायट्यांवरील देखरेख

सोसायट्यांवर देखरेख करण्यासाठी तालुका निहाय सुपरवायझर आहेत. ते कांहीं दिवसांपूर्वीच सरकारी नोकर म्हणून समजण्यांत आले असून त्यांचेवर देखरेख व नियंत्रण सहकारी खात्याचें आहे. जिल्हा सुपरवायझिंग युनिअन्स ह्यांना आतां

याबाबत फारसे अधिकार नसून त्यांचे घटनेमध्यें फरक सुचविले असून त्याप्रमाणें कांहीं युनिअन्सनीं आपल्या पोटनियमांत फरक केला आहे. नवीन योजनेप्रमाणें एक कमिटी नेमण्यांत येणार असून तिचेकडे देखरेखीचें काम सोंपविण्यांत येईल. ही योजना सोसायट्यांचे प्रतिनिधी व सध्याच्या युनिअन्स यांना फारशी मान्य नाहीं असें दिसतें.

**स्वरूप बदलणार**

शेतीपतीची पुनर्घटना करण्याचें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावें असा सर्व कार्यकर्त्यांचा आग्रह असल्यास सहकारी चळवळीचें आजचें स्वरूप बदलणें अगत्याचें आहे, हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. सहकारी चळवळ हें काम घेण्यास समर्थ आहे, किंवा नाहीं व तशी ती आज नसल्यास तिचें स्वरूप कसें बदलणार, ह्याचा विचार व्हावयास पाहिजे व तसा तो झाला असला पाहिजे. महाराष्ट्र विभाग सहकारी परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून प्रि. ध. रा. गाडगीळ यांनीं या बाबत आपला अभिप्राय पुढील-प्रमाणें नमूद केला आहे:—"सहकारी चळवळीची आजची परिस्थिती फारशी समाधानकारक नाहीं. तिची पुनर्घटना झाली पाहिजे असें सर्व म्हणतात". पुढें ते असे म्हणतात कीं, "येथें सहकारी चळवळीची नियोजित प्रगती निश्चित कशी साधावयाची याचें घडसें उत्तर सरैय्या समिति, नानावटी समिति इ. सरकारी समित्यांनीं दिलें नाहीं एवढेंच नमूद केलें म्हणजे पुरें." यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, सर्व पतवाल्या शेतकऱ्यांना कर्ज द्यावयाचें तें जर सहकारी संस्थांमार्फत द्यावयाचें तर सर्व सहकारी चळवळीची पुनर्घटना, कार्यपद्धति, प्रगतीची दिशा यांत मूलभूत फरक होणें आवश्यक; व या सर्व प्रश्नांचा विचार करूनच सर्व सहकारी कार्यकार्यांनीं हें काम आपल्यामार्फत व्हावें असें सुचविलें असावें. सहकारी चळवळीचें भावी स्वरूप श्री. गाडगीळ यांनीं पुढील शब्दांत योग्य तऱ्हेनें दाखविलें आहे:—"सहकारी अगर निमसरकारी स्वतंत्र शेतकी बँक काढण्याऐवजीं सहकारी संस्थामार्फत हें कार्य करावें असें म्हटलें म्हणजे त्यांतूनच यथाक्रम बिगर सभासदांशीं व्यवहार, ठराविक योजनेप्रमाणें प्रगति, निरनिराळ्या श्रेणींच्या सहकारी संस्थांच्या परस्पर संबंधाचें स्पष्टीकरण व दृढीकरण, प्रांतिक बँकेचें मध्यवर्ती स्थान, सरकारचें मार्गदर्शन व व नियंत्रण या सर्व गोष्टी आल्या" या पुनर्घटनेमध्यें कांहीं सहकारी संस्थांच्या स्वायत्ततेस बाध जुन्या कल्पनेप्रमाणें येणार व सहकारी चळवळीची आजवरची जी शैक्षणिक व नैतिक बाब तिलाहि कितपत बाध येईल हा मोठा विचाराचा प्रश्न आहे. त्यांतच देशाची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिति ह्या सर्वांचा विचार करतांना ही भावी पुनर्घटना यशस्वी होण्यास कांहीं अडचणी आहेत किंवा काय अशी शंका उत्पन्न होते. त्यांतच पीक कर्जाची जबाबदारी. महाराष्ट्रांतील शेतीउत्पादनाची अनिश्चितता व त्यामुळें पीक-कर्ज वसुलीवर होणारे परिणाम ह्यांचा विचार करतांना व नवीन जबाबदारी स्वीकारतांना त्यासाठी लागणारें अनकूल वातावरण निर्माण झाल्याशिवाय पुनर्घटनेचें काम कसें यशस्वी होईल ?

**सरकारी धोरणांत बदल होण्याची आवश्यकता**

सरैय्या समितीचा अभिप्राय आजच्या परिस्थितींत इतका महत्त्वाचा आहे कीं, तो समग्र उद्धृत करणें जरूर आहे.

"हिंदुस्थान सरकारनें आजवर अवलंबिलेल्या व हिंदुस्थानच्या रहाणीचें मान वाढविण्यास असमर्थ ठरलेल्या खुल्या व्यापाऱ्याच्या धोरणाचा शेवट झाल्याखेरीज नियोजन शक्य नाहीं. म्हणजेच सरकारनें शिक्षण, वहातूक, आरोग्य, शेती, उद्योगधंदे इत्यादि क्षेत्रांत व्यापक प्रमाणावर कार्य हातीं घ्यावयास हवें. आजच्या परिस्थितींत खाजगी व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व औद्योगिक योजना हातीं घेण्यांत बराच धोका पत्करावा लागत असल्यानें केवळ त्यावरच अवलंबून राहून चालणार नाहीं. सहकारी संघटनेचा अर्थच हा कीं पत्करावयाचा धोका व जबाबदारी विभागणीच्या पद्धतीनें कमी करणें. परंतु हें करण्याची संघटकाची शक्ति बरीच मर्यादित आहे. म्हणून आर्थिक व्यवहारांत खाजगी व्यक्तींना पत्करावा लागणारा धोका, त्यांना सहज अंगावर घेतां येईल इतका कमी करणें हें सरकारचें कर्तव्य आहे व यासाठी सरकारनें आर्थिक प्रश्नांत लक्ष घालून आवश्यक ते उपाय योजिले पाहिजेत. उत्पादनाच्या सर्वच क्षेत्रांत धोका आहे हें खरें, परंतु शेतींत तर त्याचें प्रमाण विशेषच जास्त असतें. याला अनेक कारणें आहेत. पावसाचा भरवसा नाहीं, उत्पादन मागणीनुसार चटकन कमीजास्त करितां येत नाहीं, लहान प्रमाणावर शेती करणाऱ्यांची फार मोठी संख्या, व बाजारभावांतील विलक्षण चढउतार. शिवाय शेती उत्पादनाच्या बाजारभावांतील चढउतारीचा एकंदर देशाच्या आर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम होतो. कारण सत्तर टक्क्यांपेक्षां जास्त लोकसंख्येच्या उत्पन्नावर व त्यामुळें बहुतेक सर्व वस्तूंच्या मागणीवर यांचा परिणाम होतो. रहाणीच्या मानावर व कच्च्या मालाच्या किंमतीवर होणाऱ्या या चढउतारीच्या परिणामामुळें औद्योगिक उत्पादनाच्या किंमतींनाही झळ लागल्याशिवाय रहात नाहीं. शेती उत्पादनाच्या किंमतींत मंदी झाल्यास शेतकऱ्यांची परिस्थिति विशेषच वाईट होते. जर पुढील कांहीं वर्षांत येणारी मंदी टाळावयाची असेल, एकंदर आर्थिक व्यवहारांत स्थैर्य आणावयाचें असेल, उत्पादन, व्यापार व शेतीच्या मालाच्या रूपांतरांतील व्यवहारांत पत्करावा लागणाऱ्या धोक्याचें प्रमाण सह्य करावयाचें असेल व सहकारी चळवळीनें खाजगी उद्योगधंद्यांशीं चढाओढींत टिकून रहावयाचें असेल तर, सरकारनें शेतकरी व गिऱ्हाईक या दोहोंनाहि न्याय्य वाटेल अशा ठराविक प्रमाणांतच शेतकी उत्पादनाच्या बाजारभावांत चढउतार होतील यासाठी कसून प्रयत्न केला पाहिजे. सहकारी चळवळीचें यश झपाट्यानें आर्थिक प्रगति करण्याकरितां सरकारनें स्वीकारलेल्या धोरणावरच अवलंबून राहील."

"आजचें हल्लींचें सरकारी धोरण कायम आहे तोंपावेतों सहकारी संस्थांची पायाशुद्ध उभारणी अशक्य व त्यांच्याकडून शाश्वत कार्य कांहीं होणार नाहीं हा वरील विवेचनाचा निष्कर्ष आहे. यामुळें सहकारी पुनर्घटनेचा व नियोजनाचा विचार करण्याचे ऐवजीं त्यासाठी लागणारी आवश्यक पूर्वस्थिति अस्तित्वांत आणणें हाच खरा महत्त्वाचा प्रश्न ठरतो" (प्रि. गाडगीळ यांच्या भाषणाचा उतारा, म. वि. स. परिषद). प्रि. गाडगीळ यांनीं इतका स्पष्ट इषारा देऊन जर हें काम सहकारी चळवळीमार्फत व्हावें असा लोकांचा आग्रह असेल तर त्यांत दोष कोणाचा? खरा मुद्दा, त्यांनीं वर वर्णन केल्याप्रमाणें, आवश्यक त्या पूर्वपरिस्थितीचा आहे व तशी पूर्वपरिस्थिति निर्माण झाली नाहीं तर दिलेलीं कर्जें मंदीच्या काळांत थकलीं जातील व मोठाच अनवस्था प्रसंग येऊन पुनर्घटित स्वरूप मात्र तसेंच राहील व सहकारी चळवळ अयशस्वी झाल्याचें अपयश माथीं येईल. इतकें आतां निश्चित, कीं आपल्या या प्रांतांत शेतीपतीच्या पुनर्घटनेची जबाबदारी सहकारी चळवळीकडे आली असून तिचें भावी स्वरूप, मुंबई प्रांतिक सहकारी बँक ही केंद्र समजून, बदलण्यांत येईल व सर्व श्रेणींच्या सहकारी संस्थांवर देखरेख व नियंत्रण वरील प्रांतिक बँक करील. कोणाही कळकळीच्या सहकारी कार्यकर्त्याचे जरी प्रामाणिक मतभेद असले तरी ह्या नवीन घटनेस यश चिंतणें हें त्याचें नैतिक कर्तव्यच ठरेल.

## दि लोकमान्य मिल्स बार्शी लि.

वरील कंपनीचें वसूल भांडवल १२ लक्ष, ७१ हजार रुपये असून घसारा फंड ७ लक्ष, ३९ हजार रुपये आहे. कंपनीनें बँकांकडून २ लक्ष, ७ हजार रुपये घेतलेले असून तिचेकडे ४ लक्ष, ६४ हजारांच्या ठेवी आहेत. ताळेबंदाच्या जिंदगीचे बाजूस ७ लक्ष, ५६ हजारांची स्थावर व ११ लक्ष, १९ हजारांची जंगम मिळकत आहे. स्टॉक-इन ट्रेड (पडलेली किंमत व बाजारभाव ह्यांतील कमी असलेल्या किं. प्र.) ५ लक्ष, ३९ हजारांचा आहे. १ लक्ष रुपयांचे सरकारी रोखे कंपनीचे पदरीं आहेत.

३१ डिसेंबर, १९४७ अखेर संपलेल्या वर्षीं कंपनीनें २८ लक्ष, ९ हजारांची विक्री केली. ३०,६६० रुपयांचा नफा आढाव्यांत घेण्यांत आला. एक्सेस प्रॉफिट टॅक्स बाबत कंपनीनें १९४४–४५ मध्यें भरलेले १,३८,१११ रु. रिपोर्टाचे सालीं परत आले. त्याची सुमारे निम्मी रक्कम डिव्हिडंड ई. फंड खातीं जमा केली व बाकीची रक्कम रिझर्व्ह फंड खातीं नेली. त्यामुळें हे फंड अनुक्रमें ६९,००० रु. व ७९,१११ रुपये (१०,००० रु. +६९,१११ रु.) असे झाले. नफ्यांतून १०,००० रुपये घसारा फंडाकडे वर्ग करण्यांत आले व ४% डिव्हिडंडला कमी पडणारी रकम नव्या डि. ई. फंडांतून घेण्यांत आली.

अहवालाचे वर्षांत कंपनीनें काटकसर करून कार्यक्षमता वाढविण्यासाठी बऱ्याच सुधारणा केल्या. पिण्याच्या पाण्याची चांगली सोय करण्यांत आली. विहिरी खोदण्याचें काम पुरें होऊन पंपहि व्यवस्थित काम देत आहेत. बोअर्सनेंहि पाण्याचा पुरवठा वाढविला आहे. फायर सर्व्हिस पंपापासून कास्ट आयर्नचे नवीन पाईप हायड्रंट सर्व्हिसकरितां घालण्याचें काम चालू केलें व त्याचप्रमाणें गरम पाणी थंड करण्याकरितां नवीन कारंजें तयार केलें आहे. कँटीनची व्यवस्था पूर्वींप्रमाणें चालू असून कामगारांच्या सुखसोईकडे लक्ष देण्यांत येत आहे. इमारती, यंत्रसामुग्री, कापूस, सूत, वगैरेचा भरपूर विमा उतरणेची तजवीज केलेली आहे. "आम्हीं ३१ डिसेंबर, १९४७ अखेर शिल्लक असलेल्या सुताच्या गांठी, पोतीं व बंडलें, त्याचप्रमाणें कापसाच्या गांठी व भोद ता. ३१–१२–४७ अखेर रोजीं मोजून पाहिले व ते बरोबर भरले व स्टोअरमधील निवडक माल तपासून पहातां तोहि बरोबर भरला आहे" असा ऑडिटरांचा रिपोर्ट आहे. त्याकडे विशेष लक्ष वेधण्याचें कारण, ह्या बाबीची ताळेबंदांतील किंमत मॅनेजिंग एजंटांच्या सर्टिफिकेटप्रमाणें लावण्याची सामान्य पद्धत असली, तरी सुलाखे आणि कं. नें त्याबाबत प्रत्यक्ष ऑडिटरांचेंच सर्टिफिकेट घेतलें आहे. ह्या सर्व वृत्तांतावरून कंपनीच्या चालकांचें प्रगतिप्रिय धोरण दिसून येतें. कंपनीची अखंड भरभराट होवो.

—×—

**सहा महिन्यांतील अन्नधान्याची आयात**—जून महिन्यांत हिंदुस्थानांत एकूण २,०४,०४० टन अन्नधान्य आयात करण्यांत आलें. हें जमेला धरून १९४८ च्या पहिल्या सहा महिन्यांत १० लाख, ७० हजार टन अन्नधान्य आयात झालें. ऑगस्ट ते ऑक्टोबरपर्यंत हिंदुस्थानला आस्ट्रेलिआकडून १ लाख टन गहूं मिळेल. ह्याशिवाय पूर्वींच्या कराराप्रमाणें ठरलेला ६,५०,००० टन गहूंहि मिळेलच. अन्नधान्याची वहातूक जलद व्हावी म्हणून हिंद सरकारच्या अन्नखात्यानें खास ४० गाड्या निरनिराळ्या भागांसाठी सोडल्या. आयात झालेलें धान्य बंदरांतून जरूर तेथें हलविण्यासाठीही अशीच त्वरा करण्यांत आली व ८०,००० टन धान्य जलद हलविण्यांत आलें.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.







कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा–कित्तूर

कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्टः–कृष्णा–कित्तूर जिल्हाः–बेळगांव.

विंचूरकर ॲण्ड को. मॅनेजिंग एजण्टस्.

### पुणें सें. को. बँकेच्या भांडवलांत वाढ

( वार्षिक सभा : १२-९-४८ )

वरील बँकेकडील वाढत्या ठेवी कानू नं. ८ चे धोरणाप्रमाणें शक्य तितक्या लवकर नियमांच्या कक्षेंत रहाव्या, म्हणून बँकेच्या भागांचें भांडवल वाढविण्याचें बोर्डानें ठरविलें आहे. नानावटी कमिटीच्या शिफारसीप्रमाणें व त्याबाबत सरकारनें जाहीर केलेल्या धोरणास अनुसरून मुं. प्रां. सहकारी बँक पांच लक्ष रु. पर्यंत रकम बँकेच्या भागांत गुंतवूं शकेल. मात्र त्यासाठी पुणें सें. को. बँकेचें भागांचें भांडवल वाढविणें जरूर झालें आहे. त्याप्रमाणें पोटनियमांत ४ लक्ष ह्या ऐवजी ६ लक्ष रुपये अशी दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे. शेअर्स वाढावा घेऊन विकण्याचाहि बोर्डाकडे अधिकार दिला जाईल. प्रत्येक शेअरचे पोटीं अशा रीतीनें २५ रुपयांपर्यंत प्रीमियम बोर्डानें मागण्यास हरकत नाहीं. प्रीमियमची रकम बँकेच्या रिझर्व्ह फंडाकडे वर्ग होईल.

सोसायट्यांना बँक ६½% दरानें कर्ज देत असे व १½% दरानें सूट देई. १ जुलै, १९४८ पासून बँकेनें ऐनजिनसी व्याजाचा दर खालीलप्रमाणें केला आहे:-

| सोसायटी | व्याजाचा दर |
|---|---|
| मुळीच थकबाकी नाहीं | ४% |
| परवानगीनें थकबाकी | ४½% |
| बाकींच्या सोसायट्या | ५% |

अहवालाचे वर्षी बँकेस ५९,४१२ रु. नफा झाला. ६% डिव्हिडंडला २४,००० रु. लागतील. गांधी स्मारक निधीस ( पुणें जिल्ह्यांतील ग्रामीण सुधारणेसाठीं ) ५,००१ रु. व केळकर स्मारक निधीस १,००१ रु. अशा देणग्या दिल्या जातील. बँकेचा ताळेबंद १ कोटी, २८ लक्ष रुपयांचा आहे; ठेवींचा आकडा १ कोटी, १५ लक्ष रुपयांवर आहे. ( चेअरमनः प्रा. ध. रा. गाडगीळ., मॅ. डायरेक्टरः श्री. द. दि. चितळे )

---

### बार्शी सें. को. बँक लि.

( वार्षिक सभा : ५-९-४८ )

वरील बँकेनें ३०-६-४८ अखेर संपलेल्या वर्षी उत्कृष्ट प्रगति केली आहे. शेअर भांडवल, ठेवी, कर्जाऊ दिलेली रकम, निवळ नफा, इत्यादि सर्व बाबतींत, गेल्या पांच वर्षांचे आकडे पाहता, बँकेनें उच्चांक गाठला आहे. व्याजाचे दर कमी करूनहि ठेवींत सुमारें ३ लक्ष रुपयांची वाढ होऊन ठेवींची रकम १५½ लक्ष रुपये झाली. माल तारण व्यवहाराकडे बरेच नवीन खातेदार झाले असून सहकारी संस्था, व्यापारी व व्य. सभासद ह्या सर्वांस बँकेच्या सोई व सवलती अधिकाधिक कशा मिळतील, इकडे बोर्डानें लक्ष ठेवलें आहे. व्यवहारांतील वाढ व देणें व्याजांतील बचत, ह्यांमुळें नफ्यांत मोठी वाढ झाली आहे. बँकेनें वाढत्या ठेवींचा विनियोग कर्ज व्यवहार वाढविण्याकडे करण्याचें धोरण अवलंबिलें आहे. त्याचा सुपरिणाम नफ्यावर झाला आहे.

अहवालाचे वर्षी १५,११० रु. नफा झाला. बॅड डेट फंडांत भर घालण्यासाठीं २,००० रु., डि. ई. फंडास भर १,७१२ रु. १४ आ., बोनस १,५०० रु., डिव्हिडंड (६½%) ४,७६३ रु. असे सुचविलेल्या नफा वाटणींतील प्रमुख आकडे आहेत. महात्मा गांधी स्मारक निधीस ५०० रु. व इतर स्थानिक संस्थांस २०० रु. चालू नफ्यांतून धर्मादाय कामीं खर्च करावेत अशी बोर्डाची शिफारस आहे. ( चेअरमन : श्री. गो. र. काळे, जमीनदार व सावकार; मॅनेजर: श्री. र. प. पटवर्धन, सी. ए. आय. आय. बी.)

**टॅरीफ बोर्डाकडे नवी कामगिरी**—देशांत उत्पन्न केल्या जाणाऱ्या विविध जिनसांच्या उत्पादनाला काय खर्च येतो, त्यांची घाऊक किंमत व किरकोळ किंमत काय असावी, ह्याची चौकशी करण्याचें काम टॅरिफ बोर्डाकडे सोपविण्यांत येणार आहे. सरकारला जरूर वाटेल तेव्हां हें काम करण्यास तें टॅरीफ बोर्डाला सांगूं शकेल. ह्याशिवाय, परदेशांच्या स्वस्त मालापासून देशी उद्योगधंद्यांचा बचाव करण्यासाठीं काय करावें ह्यासंबंधींही वेळ पडेल तेव्हां बोर्डानें शिफारसी करावयाच्या आहेत.

**ब्रिटन-हिंद व्यापार**—ब्रिटनकडून निर्यात होणाऱ्या मालापैकीं १९३८ सालाइतकाच माल आजही हिंदुस्थानांत आयात होत आहे, इतकेंच नव्हे तर कांहीं बाबतींत हिंदुस्थानचा वांटा वाढलेला आहे. १९४७ सालीं ब्रिटनमधून निर्यात झालेल्या भांडवली मालापैकीं १२ टक्के माल हिंदुस्थाननें आयात केला. १९४८ च्या पहिल्या दोन महिन्यांत हिंदुस्थाननें ब्रिटनकडून सर्वांत जास्त भांडवली स्वरूपाचा माल घेतला, असें दिसून येतें.

**सरकारी प्रकाशनाचें दुकान**—नवी दिल्ली येथें हिंद किताब-महाल ह्या सरकारी प्रकाशन संस्थेचें उद्घाटन करण्यांत आलें. कलकत्याला सरकारचें इंडिआ बुक डेपो म्हणून दुसरें एकच दुकान आहे. हिंद सरकारचें प्रकाशनखातें देशांतील सर्वांत मोठें पुस्तकांचीं विक्री करणारें दुकान आहे. ह्या खात्यातर्फे नागरी व लष्करी स्वरूपाचीं मिळून २६ हजार प्रकारचीं प्रकाशनें प्रसिद्ध होतात. खात्याच्या कचेरींत ७५ लाख, ७८ हजार पुस्तकें आहेत, आणि त्यांनीं ५४,२०० चौरस फूट जागा व्यापली आहे.

**राजकारणपटूंची मानस-परीक्षा**—जगांतील २४ तज्ज्ञ मानस शास्त्रज्ञांनीं नुकताच एक मानस शास्त्रीय अहवाल प्रसिद्ध केला आहे. ह्या अहवालांत, जागतिक शांतता टिकविण्यासाठीं जे मुत्सद्दी वाटाघाटी करतात, त्यांच्या मनांची चांचणीवजा परीक्षा करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें आहे.

**टाटा कंपनीनें कर्ज मागितलें नाहीं**—आपली यंत्रसामुग्री वाढविण्यासाठी टाटा कंपनीनें सरकारकडे २० कोटी रुपयांचें कर्ज मागितलें आहे, ह्या बातमींत सत्यांश नाहीं.

---


### धी बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव बँक लि.

## नोटीस

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ३७ वी वार्षिक सर्व-साधारण सभा शनिवार ता. ४ सप्टेंबर १९४८ रोजीं दुपारीं २ वाजतां ( स्टॅं. टा. ) तिच्या रजिस्टर्ड ऑफिसांत, ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई ) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

( १ ) ३० जून १९४८ रोजीं संपणाऱ्या वर्षाचें तपासलेले ताळेबंद, नफातोटा पत्रक व डिरेक्टरांचा रिपोर्ट स्वीकारणें.
( २ ) नफ्याची वांटणी करणें व डिव्हिडंडचा दर ठरविणें.
( ३ ) डिरेक्टरांची निवडणूक करणें.
( ४ ) ऑडिटर्स नेमून त्यांचें वेतन ठरविणें.

बोर्डाच्या हुकुमावरून,
व्ही. पी. वर्दे,
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर,

मुंबई
ता. ९-८-४८

भागांच्या तबदिलीचें काम ( ट्रान्सफर बुकें ) ६ सप्टेंबर १९४८ ते २५ सप्टेंबर १९४८ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.

### श्री. बी. आर. केंभावी ह्यांचा अभिनंदनीय उपक्रम

बँकिंगच्या धंद्याची परिपूर्ण माहिती असलेले श्री. बी. आर. केंभावी ह्यांनीं मुंबई व पुणें येथील कांहीं प्रमुख बँकांच्यासंबंधीं माहिती दर्शविणारे तक्ते तयार केले आहेत. त्यांत भरणा झालेलें भांडवल, ठेवी, एकूण देणीं, रोख रकमेचें एकूण देण्यांशीं प्रमाण, सरकारी रोख्यांतील गुंतवणुकीचें एकूण देण्यांशीं प्रमाण, दिलेल्या कर्जाचें एकूण देण्यांशीं प्रमाण, रिझर्व्हचें एकूण देण्यांशीं प्रमाण, नफ्याचें भरणा भांडवलाशीं प्रमाण, शाखांची संख्या इत्यादि बाबत बँकांच्या स्थापनेपासूनच्या आकड्यांचें प्रमाणशीर चढत्या उतरत्या रेषांत रूपांतर करण्यांत आलें आहे. त्यामुळें, प्रगतीचें स्वरूप चटकन नजरेस येण्यास मदत होते, आणि बँकांच्या चालकांना त्यामुळें मार्गदर्शन होऊं शकतें. श्री. केंभावी ह्यांच्या ह्या प्रयत्नाचा फायदा बँकांनीं घेण्याजोगा आहे.

---

### " सहकारी जगत् "

प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूट आणि महाराष्ट्र विभाग सहकारी शिक्षण मंडळ ह्यांच्या ह्या त्रैमासिक मुखपत्राचा एप्रिल–जून १९४८ चा अंक नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत पहिलीं ५ पृष्ठें संपादकीय मजकूर असून पुढें पांच स्वतंत्र लेख देण्यांत आले आहेत. सहकारी संघराज्य ( श्री. म. धों. विद्वांस, एम. ए., एल-एल. एम. ), हात घाणे व त्यांची आजची परिस्थिति ( श्री. द. दि. चितळे ), गृहमंडळ्यांचें कार्य (श्री. य. रा. दाते, बी. ए., एलएल. बी.), मुंबई प्रांतांत सहकारी शेती ( डॉ. ना. वि. कानिटकर ), भावी ग्रामराज्यांतील आदर्श सहकारी जीवन ( श्री. अप्पासाहेब सहस्रबुद्धे ). ना. वै. ल. मेहता ह्यांचें ' नियंत्रित पेठा' ह्या विषयावरील, प्रां. मार्केटिंग परिषदेच्या रेग्यु. मार्केटस विभागाच्या उद्घाटनाच्या वेळचें भाषणहि त्रैमासिकांत देण्यांत आलें आहे.

---

**काश्मीरमधील निर्वासित**—काश्मीरवरील टोळीवाल्यांच्या आक्रमणामुळें घरें-दारें नष्ट झालेल्या निर्वासितांच्या वसाहतीची योजना जम्मू–काश्मीर सरकारनें जाहीर केली आहे. रणवीरसिंग तहसीलमधील तेरा हजार एकर जमीन आतांपर्यंत निर्वासितांना देण्यांत आली आहे.

**सरकारी नोकऱ्यांसाठी १७ हजार अर्ज**—इंडिअन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह अँड पोलिस सर्व्हिसमध्यें भरती करण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें मागविलेल्या अर्जांचा विचार करण्याकरतां स्पेशल रिक्रूटमेंट बोर्ड स्थापण्यांत आलें आहे. बोर्डांत श्री. आर. एन्. बानर्जी ( अध्यक्ष ), श्री. ए. बी. लठ्ठे, मि. एस्. जी. ग्रब व श्री. व्ल्य. आर. पुराणिक हे सभासद आहेत. एकूण अर्ज १७ हजार आले असून त्यांत शंभर स्त्रियांचे अर्ज आहेत. बोर्ड सहा महिने मुलाखती घेण्यासाठी हिंडणार आहेत. ह्या दौऱ्यांत मुंबई, नागपूर, पाटणा, कटक, शिलाँग, कलकत्ता, मद्रास, लखनौ इत्यादि गांवांना बोर्ड भेट देईल. अर्जदारांपैकीं १० टक्के उमेदवारांच्याच मुलाखती बोर्ड घेणार आहे असें समजतें. सगळ्यांत जास्ती अर्ज मद्रास प्रांतांतून म्हणजे ४ हजारांवर आलेले आहेत. ओरिसांतून फक्त २०६ आलेले आहेत. मुंबई प्रांतांतून २,६०० अर्ज आले आहेत. त्यांपैकीं सुमारे २०० अर्जदारांना मुलाखतीसाठी बोलविलें जाईल. बोर्डाच्या सभासदांपैकीं श्री. बानर्जी हे गृहखात्याचे प्रतिनिधी आहेत. श्री. लठ्ठे घटना समितीचे सभासद आहेत. श्री. पुराणिक आणि मि. ग्रब हे फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशनचे प्रतिनिधी आहेत.


# सारस्वत

## को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५

| | |
|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ४,११,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,३०,४०० |
| ठेवी ... | रु. ७२,३०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ८९८१,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा —

सब–ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

---

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## – शेड्यूल्ड बँक –

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,००,००,००० |

### संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे ( चेअरमन )

श्री. वा. पुं. वर्दे ( व्हा. चेअरमन )

| | |
|---|---|
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. मा. रा. जोशी | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. वि. शहा | श्री. शं. ल. किर्लोस्कर |
| श्री. भा. म. गुप्ते | श्री. मो. रा. ढमढेरे |

ट्रस्टी व एक्झीक्युटरचे कामाबाबत चौकशी करा.

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २

चिं. वि. जोग, मॅनेजर.

# वि ज य
# टेक्स्टाइल्स लि.

—येरंडवणा, पुणें ४—

आमची गेल्या वर्षांतील सर्वांगीण प्रगति आमच्या भागीदारांस व हितचिंतकांस निश्चित समाधानकारक वाटेल.

**शेअर्स व ठेवी ह्याबद्दल पत्रव्यवहार करावा.**

**मॅनेजिंग एजंटस्.**

# दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि.

हेड ऑफिसः—९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई

स्थापना : १९११

चेअरमनः—श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी | ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी | ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल | ... ... | ७,७७,३३,००० रु. |

**११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.**

**मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बँक.**

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बँकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

—अटींसाठी चौकशी करावी—

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


नवीन पुष्कळ निघाले, तरी

# तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि

# बँक ऑफ इंडिया, लि.

**स्थापना १९०६**

| | |
|---|---|
| खपलेलें भांडवल :- | ३,००,००,०००. |
| वसूल झालेलें भांडवल :- | १,५०,००,०००. |
| राखीव फंड :- | २,००,००,०००. |

मुख्य कचेरी :—ओरिएंटल बिल्डिंग्ज, मुंबई.

इतर शाखा :- मुंबईः- बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबा देवी व मलबार हिल. मुंबई नजीकः—वांद्रें व अंधेरी. अहमदाबादः—भद्र (मुख्य शाखा), गांधी रोड, इलिस ब्रिज, माणिक चौक व स्टेशन शाखा. कलकत्ता :- क्लाइव्ह स्ट्रीट (मुख्य शाखा), बडा बाजार व चौरंघी स्केअर. नागपूरः—किंग्ज वे व इतवारी बाजार. पुणें:— लष्कर व शहर. मद्रास, कोईमतूर, कालिकत, अमृतसर, भुज (कच्छ), जमशेटपूर, जुनागड, कराची, पालनपूर, राजकोट, सुरत, सोलापूर, वेरावल.

लंडन शाखा :- १७ मूरगेट, लंडन ई. सी. २.

न्यूयॉर्क एजंट्स :-दि चेस नॅशनल बँक ऑफ दि सिटी ऑफ न्यूयॉर्क.

डायरेक्टर्स :-सर कासवजी जहांगीर, बॅरोनेट, जी. बी. इ., के. सी. आय. इ. चेअरमन; श्री. अंबालाल साराभाई, सर जोसेफ के. नाइट, मि. दिनशा के. दाजी, श्री. रामनिवास रामनारायण, ना. सर शांतिदास अस्करन, नाइट, मि. महंमद सुलेमान कासम मिठा, सर किकाभाई प्रेमचंद, नाइट, श्री. भगवानदास सी. मेहता, श्री. कृष्णराज एम. डी. ठाकरसी.

चालू ठेवींचें खातें:—कांहीं ठिकाणें सोडून रोजच्या रु. ३०० ते रु १ लक्ष पर्यंतच्या शिलकेवर दरसाल द. शें. एकचतुर्थांश रु. व्याज देण्यांत येतें. रु. १ लाखाहून जास्त शिलकेवर खास योजनेनें व्याज दिलें जातें. सहामाही व्याज रु. ५ पेक्षा कमी झाल्यास तें दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग्ज बँक ठेवी योग्य अटींवर स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें. विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते. सर्व तऱ्हेचें ट्रस्टीचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

बँकेसंबंधीं नेहमींचा सर्वसामान्य व्यवहार केला जातो.

बी. एन्. अटल, एजंट, पुणें


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२१ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.